

मधुसूदन कालेलकर

# गुलमोहोर

# गुलमोहोर

मधुसुदन कालेलकर

मॅजेस्टिक बुक स्टॉल

प्रकाशक :
के. वि. कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव, मुंबई ४.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५०/अ, शनवार पेठ, पुणे ३०.

©
सौ. मीना कालेलकर

प्रथमावृत्ती :
मे १९७८

हक्क :
'गुलमोहोर' या नाटकाच्या भाषांतराचे,
पटकथेचे, नभोवाणीचे व पुनर्मुद्रणाचे
इत्यादी सर्व हक्क
सौ. मीना कालेलकर
यांचे स्वाधीन आहेत.

या नाटकाच्या तालमींना सुरुवात करण्या-पूर्वी परवानगीसाठी पुढील पत्त्यावर पत्र-व्यवहार करावा —

सौ. मीना कालेलकर,
सी–२ ज्ञानदेवी, साहित्य सहवास,
वांद्रा ( पूर्व ), मुंबई ५१

मुखपृष्ठ :
कमल शेडगे

मान्यता प्रमाणपत्र क्रमांक :
डी. आर. एम्.
९६०/१३–१२–७७

मूल्य : [redacted] 10/-

## " असा बहरला गुलमोहोर "

खरं म्हणजे गुलमोहोर वसंतात बहरून येतो. पण हा गुलमोहोर वसंताच्या आधीच बहरला ! चंद्रलेखेचे निर्माते मोहन वाघ यांची खूप इच्छा होती, की मी त्यांच्यासाठी नाटक लिहावं ! माझीही होती ! पण त्यांच्या चंद्रलेखेतील कलावंत फिट्ट बसतील अशी कल्पना सुचणं आवश्यक होतं ! त्यातील मुख्य कलावंत म्हणजे तोरडमल व आशालता ! एके दिवशी असाच विचार करीत असताना, प्रौढ प्रेमिकांच्या प्रेमाचा विषय सुचला. मी तोरडमलना फोन करून ती कल्पना त्यांना ऐकवली. त्यांनी ताबडतोब मोहन वाघांना फोन करून ऐकवली ! आणि वाघांचा मला फोन आला, की कल्पना मस्त आहे ! लिहिणं सुरू करा ! नाटकाचा लेआऊट मी केला. तोरडमल व वाघांना ऐकवला ! त्यांत काही फेरबदल सुचवले गेले आणि त्यानुसार मी नाटक लिहून पूर्ण केलं ! पण या नाटकाला सार्थ नाव सुचत नव्हतं ! ते मोहन वाघांनी सुचवलं ! गुलमोहोर ! नाटक बसवताना बदलत्या दृष्यांच्या सेटची अडचण आली ! आणि त्याकरता सोईसाठी काही बदल तोरडमलानी केले. माझ्या सम्मतीनं. म्हणून नाटकाच्या प्रयोगात असलेलं सगळंच या पुस्तकात नाही ! आणि पुस्तकाबरहुकुम नाटकही नाही ! कारण नाटक बघणं निराळं नी वाचणं निराळं ! कारण पुस्तक ही वर्षानुवर्षं टिकणारी साहित्यकृती असते ! या नाटकासाठी मोहन वाघ व तोरडमल यांनी खूप मेहनत घेतली ! तोरडमलांनी नाटकाला एक सुरेख वेग दिला ! इतर कलाकारांनी, तंत्रज्ञांनी त्यांना सुयोग्य साथ दिली ! गुलमोहोरचा सेट, ही वाघांच्या कल्पकतेची करामत होती.

या नाटकाच्या बाबतीत विशेष भाग्याची गोष्ट म्हणजे ३१ डिसेंबर १९७७ ला या नाटकाचे एकाच दिवशी एकच थिएटरात ( शिवाजी मंदिर ) ४ प्रयोग झाले आणि चारही हाउसफुल्ल गेले ! याहून दुसरा दिग्विजय म्हणजे "विक्रांत" या युद्ध नौकेवर या नाटकाचा झालेला प्रयोग ! भर समुद्रात आभाळाच्या साक्षीनं नौदलातील अधिकारी व त्यांची कुटुंबीय यांच्या समोर हा प्रयोग झाला ! अशी किमया फक्त मोहन वाघच करू शकतात. आम्हा सर्वांच्या दृष्टीने तो एक भाग्याचा क्षण होता ! नेहमीप्रमाणे या नाटकाची रंगावृत्ती बाबू सेंजित याने केली व ती पुस्तकरूपाने वाचकांसमोर आणली माझे मित्र श्री. केशव कोठावळे यांनी ! आमच्या दोघातल्या मैत्रीचा गुलमोहोर असाच फुलत राहो आणि वाचकांचं प्रेम मला सदैव मिळत राहो, हीच इच्छा.

मधुसूदन कालेलकर

सी-२, ज्ञानदेवी,
साहित्य सहवास,
वांद्रा ( पूर्व ),
मुंबई–५१

चंद्रलेखा प्रकाशित, मधुसूदन कालेलकर लिखित " गुलमोहोर " या नाटकाचे शुभारंभाचे चार प्रयोग शनिवार दि. ३१ डिसेंबर १९७७ रोजी सकाळी १० वा., दुपारी ४ वाजता, रात्री ८–३० वाजता आणि मध्यरात्री २ वाजता शिवाजी मंदिर, दादर, या नाट्यगृहात झाले. यात भाग घेतलेले कलावंत—

## पात्रपरिचय

| | | |
|---|---|---|
| अशोक शिरगावकर | : | प्रा. मधुकर तोरडमल |
| संपत | : | अरुण सरनाईक |
| सदाचारी | : | मोहन मुंगी |
| मुरली मनोहर | : | जगन्नाथ कांदळगावकर |
| रवि सुलाखे | : | उपेन्द्र दाते |
| रघू | : | वसंत विचारे |
| ज्यूली | : | विनोदमाला जोशी |
| अंजली | : | नीना जोशी |
| आत्याबाई | : | मंदाकिनी भडभडे |
| सुनिता | : | आशालता |
| दिग्दर्शक | : | प्रा. मधुकर तोरडमल |
| निर्मिती, नेपथ्य, प्रकाशयोजना | : | मोहन वाघ |
| पार्श्वसंगीत | : | श्रीनिवास खळे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नेपथ्य साहाय्यक | : | स्टुडिओ रवि परांजपे | साहाय्यक | : | बाबू पुरोहित |
| रंगभूषा | : | कृष्णा बोरकर | प्रकाशयोजना | : | बाबा, अरुण, सुरेश |
| वेशभूषा | : | जगन नताव्रे, लक्ष्मण गोपाळ | रंगमंच व्यवस्था | : | दत्ता चौधरी, वसंत विचारे, हनुमान शिंदे |
| व्यवस्थापक | : | मनोहर कदम. | | | |

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ पडदा उघडतो आणि नयनरम्य अशा हिल स्टेशनवरील ' हॉटेल गुलमोहोर 'चा सुसज्ज हॉल दिसू लागतो. प्रवेशद्वाराच्या बाजूला काऊंटर असून त्यावर टेलिफोन व एअरइंडियाचा महाराजा आहे. त्याच्या बाजूला ' रिसेप्शन ' अशी पाटी आहे. उजव्या बाजूला कोपऱ्यात वर जाण्याचा जिना आहे. त्यालगत दोन खोल्या आहेत. त्यांच्या समोरच्या बाजूला एक खोली आहे. किचनचं प्रवेशद्वार जिन्याच्या डाव्या बाजूला आहे. हॉलच्या मध्यभागी सोफासेट व टीपॉय असून टीपॉयवर ॲशट्रे व निरनिराळी मासिकं आहेत. किचनच्या लगत फायरप्लेस आहे. फायरप्लेसच्या वर एक मोठी लांबट आकाराची फ्रेंच विंडो असून, त्यातून मागे फुललेला गुलमोहोर दिसतो आहे. काउंटरलगत एक रेडिओग्राम आहे. त्यावर हळुवार पार्श्वसंगीताची रेकॉर्ड लागली आहे. काऊंटरवर ज्यूली ( सौ. संपत ) बसली असून ती टेलिफोनवर बोलते आहे. ]

ज्यूली : येस...हॉटेल गुलमोहोर ! गुड मॉर्निंग ! मालक बाहेर गेले आहेत ! मी त्यांची मिसेस् बोलतेय ! नाही. हॉटेलमधे एकही रूम खाली नाही ! काय ? वर चालेल ? अहो, खाली म्हणजे मोकळी ! आय ॲम् रिअली सॉरी...

[ फोन ठेवते. तोच आतून सदाचारी येतो. निरनिराळ्या हॉटेल्समधे राहाणं व तिथल्या वस्तू लंपास करणं हा त्याचा छंद ! ]

सदाचारी : गुड मॉर्निंग, मिसेस् संपत.
ज्यूली : गुड मॉर्निंग !
सदाचारी : मिस्टर संपत दिसत नाहीत कुठं ?
ज्यूली : ते स्टेशनवर गेलेयत कस्टमर्संना आणायला !
सदाचारी : मालक स्वतः जातीनं ?
ज्यूली : दोन बायका आहेत ! आणि प्रथमच येताहेत इथे !
सदाचारी : अहो, मग मला सांगायचं ! मी गेलो असतो ! तेवढीच सोशल सर्व्हिस.
ज्यूली : तुम्ही आल्यापासून तुम्हांला विचारीन, विचारीन म्हणतेय, मिस्टर सदाचारी...
सदाचारी : ( आशेनं ) अरे, वा ! विचारा की !

ज्यूली : हे तुमचं 'सदाचारी' हे नाव कसं काय पडलं ?

सदाचारी : त्याचं काय आहे... आमचा पिढीजात धंदा आचाऱ्याचा ! आजोबा एका संस्थानिकाकडे मुख्य आचारी होते ! त्यांच्या प्रामाणिकपणावर खूश होऊन संस्थानिकांनी त्यांना सदाचारी हा किताब दिला !

ज्यूली : अस्सं !

सदाचारी : प्रामाणिकपणा हा आमचा पिढीजात गुण...

[ हळूच टिपॉयवरील ॲशट्रे खिशात टाकतो व जाऊ लागतो. ]

ज्यूली : फिरायला निघाला वाटतं ?

सदाचारी : फिरायला म्हणजे बागेत पाय मोकळे करायला ! मुंबईत कुठेही पाय मोकळे करायची सोय नाही.

ज्यूली : का, हो ?

सदाचारी : शेजारच्या माणसाला ते पाय लागतील, ही भीती ! कुठेही जा, गर्दीच गर्दी. चालता चालता सहज आपल्या खिशात हात घालावा नि तो खिसा दुसऱ्याचा निघावा, असं होतं ! ( ज्यूली हसते ) शहरातलं सगळं रुक्ष ! पण इथं आलो नि डोळ्याचं पारणं फिटलं ! अहाहा, ( तिच्याकडे पाहात ) कुंडीत न मावणारे ते टपोरे गुलाब... तो सुबक डेलिया... धुंद करणारं ते कृष्णकमळं ! ( तिच्याकडे पाहात ) पण एक त्रास आहे.

ज्यूली : कसला ?

सदाचारी : जवळ जाऊनही हात लावता येत नाही. ( जवळ जातो. ती दचकते. ) फुलांना ! कारण मिस्टर संपतनी पाटी लावलीय ना ! फुलांना हात लावू नये, म्हणून ! जाऊ दे. नुसता दर्शनाचा आनंदही काही कमी नाही. कुणीतरी म्हटलंच आहे, 'दर्शनमात्रे मन कामना पूर्ति...'

[ बाहेर जातो. जाता जाता काऊंटरवरील टूथपिकची डबी खिशात घालतो. ज्यूली काऊंटरवर पाहाते. ]

ज्यूली : ( स्वतःशीच ) टूथपिकची डबी काय झाली ? की ठेवायलाच विसरले मी ?

[ घाईघाईने आत निघून जाते, तोच प्रवेशद्वारातून संपत आत येतो. चाळीशीचा—मध्यमवयीन तरुण. चेहऱ्यावर सदा स्वागतशील हास्य. ]

संपत : यावं, बाईसाहेब. हॉटेल गुलमोहोरच्या वतीनं मी आपलं स्वागत करीत आहे.

[ बाहेरून सुनीता व अंजली येतात. सुनीता ही पस्तीशीची प्रौढ कुमारिका असून डोळ्यांवर चष्मा आहे. अंजली ही सुनीताच्या बहिणीची मुलगी. ती विशीतली आहे. ]



सुनीता : थँक यू, मिस्टर संपत !

संपत : नो मेन्शन, मॅडम !

सुनीता : पण खरंच, तुम्हांला त्रास पडला स्टेशनवर यायचा.

संपत : त्रास कसला ! कर्तव्य आहे ते हॉटेल–मालकाचं ! त्यातून तुम्ही प्रथमच येताय.

सुनीता : हिच्यासाठी यावं लागलं ! ही माझ्या बहिणीची मुलगी अंजली !

संपत : वा वा ! बरं का, अंजली, हे हॉटेल समजायचं नाही ! आपलं घर समजायचं— बऱ्या माणसासारखं राह्यचं.

अंजली : फक्त जाताना बिल द्यायचं.

[ संपत हसतो. ]

संपत : चला मी तुम्हाला खोली दाखवतो ना मिस्—नाही म्हणजे— रजिस्टरमधे नाव लिहिलंय. पण विसरलो...

सुनीता : सुनीता—

संपत : या.

[ दोघींना घेऊन डावीकडल्या खोलीत निघून जातो. उजव्या बाजूच्या खोलीतून कादंबरीकार मुरली मनोहर येतो. त्याच्या तोंडात चिरूट आहे व हातात एक पुडकं आहे. तोच सुनीताच्या खोलीतून संपत बाहेर येतो. ]

संपत : गुड मॉर्निंग, मिस्टर मुरली मनोहर.

मु. मनोहर : गुड मॉर्निंग ! बाय द वे, मिस्टर संपत, आपल्या कुणा नोकराकरवी हे पार्सल पोस्टात टाकायला लावा.

संपत : बाय ऑल मीन्स्. ( पुडकं हातात घेतो ) बापरे. बरंच जड आहे ! आहे काय एवढं त्यात ?

मु. मनोहर : माझ्या नवीन कादंबरीचं पहिलं प्रकरण !

संपत : बरंच मोठं दिसतंय प्रकरण !...

मु. मनोहर : पहिल्या प्रकरणातच सारा माल मसाला खच्चून भरलाय ! तीन बलात्कार आहेत.

संपत : बापरे !

मु. मनोहर : पानापानातून सेक्स ओसंडून वहातोय. शिव्या तर बोलूच नका ! सगळ्या वापरल्यायत.

संपत : म्हणजे लोकांना वापरायला ठेवल्याच नाहीत !

मु. मनोहर : लोकांचं काय ? ते नवीन शिव्या शोधून काढतील ! ओव्यांचं राज्य संपलं ! आता शिव्यांचं सुरू आहे. या कादंबरीत काय नाही ? गर्भपात आहे. पातळाला